# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## शिकाऊ उमेदवार भरती सन २०२६-२७

## जाहिरात प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थायी आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम - १९६१ नुसार तात्पुरत्या स्वरुपात एक वर्ष कालावधीकरीता सन २०२६ – २७ या सत्रासाठी शिकाऊ उमेदवारांची नेमणूक करणेकरीता शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करणाऱ्या आय. टी. आय. उत्तीर्ण उमेदवारांकडून NAPS Portal द्वारे ऑनलाइन अर्ज मागविणेकामी मनपाचे अधिकृत www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. त्यासाठी व्यवसायनिहाय आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता, आळीपाळीने भरावयाच्या सामाजिक आरक्षणनिहाय जागा इत्यादी बाबींचा उल्लेख खालीलप्रमाणे करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | भरवयाच्या पदांची संख्या | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | साशै माप्र | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोपा (COPA) | १०६ | १४ | ०७ | ०३ | ०३ | ०४ | ०२ | ०२ | २० | ११ | ११ | २९ |
| २ | तारतंत्री (Wireman) | ८७ | ११ | ०६ | ०३ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | १६ | ०९ | ०९ | २४ |
| ३ | वीजतंत्री (Electrician) | ८० | १० | ०६ | ०२ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | १५ | ०८ | ०८ | २२ |
| ४ | डेस्कटॉप ऑपरेटींग (DTPO) | ४२ | ०५ | ०३ | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०८ | ०४ | ०४ | १२ |
| ५ | नळ कारागीर (Plumber) | २४ | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०४ | ०२ | ०२ | ०७ |
| ६ | रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग टेक्निशियन (RACT) | २१ | ०३ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०४ | ०२ | ०२ | ०६ |
| ७ | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक (POCM) | १५ | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०३ | ०१ | ०२ | ०४ |
| ८ | भूमापक (Surveyor) | १४ | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०३ | ०१ | ०१ | ०४ |
| ९ | आरेखक स्थापत्य (Draughtsman Civil) | ८ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ |
| १० | मेकॅनिक मोटर व्हेईकल (MMV) | ४ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ |
| ११ | इंस्ट्रुमेंट मेकॅनिक (IM) | ३ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| १२ | माळी (Gardner) | ३ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| | एकूण | ४०७ | | | | | | | | | | | |

उपरोक्त तक्तामधील अनु. क्र. ०५ ते १२ मधील पदे ही छोट्या संवर्गाची पदे असल्यामुळे यापूर्वी ज्या प्रवर्गात पदे भरण्यात आलेली होती, त्यानुसार आळीपाळीची पदे त्या त्या प्रवर्गानुसार भरण्यात येणार आहे.

| अ. क्र. | व्यवसायाचे नाव | व्यवसाय प्रशिक्षण कालावधी | शैक्षणिक अर्हता ( Eligibility Criteria ) |
|---|---|---|---|
| १ | कोपा (COPA) | १ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कोपा-पासा कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| २ | वीजतंत्री (Electrician) | २ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रिशियन कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| ३ | तारतंत्री (Wireman) | २ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील वायरमन कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| ४ | डेस्कटॉप ऑपरेटींग (DTPO) | १ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील डेस्कटॉप ऑपरेटींग कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| ५ | नळ कारागीर (Plumber) | १ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्लंबर कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| ६ | रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग टेक्निशियन (RACT) | २ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील रेफ्रिजेरेशन अँड कंडिशनिंग टेक्निशियन कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| ७ | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक (POCM) | १ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील पंप ऑपरेटर कम मेकॅनिक कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| ८ | भूमापक (Surveyor) | २ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व्हेअर कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| ९ | आरेखक स्थापत्य (Draughtsman Civil) | २ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील आरेखक स्थापत्य कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| १० | मेकॅनिक मोटर व्हेईकल (MMV) | २ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मेकॅनिक मोटर व्हेईकल कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| ११ | इंस्ट्रुमेंट मेकॅनिक (IM) | २ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इंस्ट्रुमेंट मेकॅनिक कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |
| १२ | माळी (Gardner) | १ वर्ष | सरकारमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील माळी कोर्स उत्तीर्ण (ITI Pass) |

<u>अटी व शर्ती-</u>

१) उमेदवारांनी www.apprenticeshipindia.gov.in (NAPS Portal) या संकेतस्थळावर १००% Profile Update करून आवश्यक ती कागदपत्रे Upload करून नोंदणी (Registration) करणे आवश्यक आहे.

२) उमेदवारांचे बँक - आधार सीडिंग असणे आवश्यक आहे. म्हणजेच आधार क्रमांक बँक खात्याशी जोडणे, जे थेट लाभ हस्तांतरण (DBT) साठी आवश्यक आहे. तसेच ते DBT साठी सक्षम (Enable) असणे आवश्यक आहे. त्याशिवाय उमेदवार अर्ज करण्यास पात्र होणार नाही, याची नोंद घ्यावी.

३) सदरच्या नेमणूका ह्या फक्त शिकाऊ उमेदवार अधिनियम - १९६१ नुसार विहित केलेल्या प्रशिक्षण कालावधीसाठी रिक्त होणाऱ्या जागेवर एक **वर्ष कालावधीकरीता नियमाधीन विद्यावेतनावर** केवळ तात्पुरत्या स्वरुपात केल्या जाणार आहेत. शिकाऊ उमेदवार अधिनियमानुसार प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आल्यानंतर नेमणूक संपुष्टात येईल. अशा उमेदवारांचा महापालिकेतील कोणत्याही पदांवर हक्क राहणार नाही.

४) उमेदवारांचा १ वर्षाचा प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर कायमस्वरूपी पदावर दावा करणार नाही, असे हमीपत्र लिहून देणे आवश्यक राहील.

५) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने www.apprenticeshipindia.gov.in (NAPS Portal) वर Online अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक २७/०४/२०२६ ते दिनांक ०६/०५/२०२६ पर्यंत राहील. सविस्तर जाहिरात **www.pcmcindia.gov.in** या महापालिकेच्या संकेतस्थळावर मुख्य पृष्ठ —> भरती —> शिकाऊ उमेदवार नेमणूक सन २०२६ - २७ किंवा मुख्य पृष्ठ—> आमच्या बद्दल —> नोकरी विषयी—> शिकाऊ उमेदवार नेमणूक सन २०२६ – २७ यामध्ये प्रसिध्द करण्यात येईल. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने उमेदवारांकरीता NAPS Portal वर Opportunity Create करण्यात आली असल्याने उमेदवारांनी सदर Portal वर विहित मुदतीत ऑनलाइन apply करणे आवश्यक राहील. मुदतीनंतर प्राप्त ऑनलाइन अर्जाचा विचार केला जाणार नाही. (पोस्टाने / ई-मेलने अथवा समक्ष आणून दिलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी).

६) NAPS Portal वर Apprenticeship Opportunities (Estblt. Code : E05202701091) मधून ऑनलाइन अर्ज केलेनंतर उमेदवाराने संपूर्ण भरलेला Profile अर्ज, जातीचा दाखला / प्रमाणपत्र, उमेदवार EWS (आदुघ) किंवा SEBC (साशैमाप्र) असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, पासपोर्ट फोटो, आधारकार्ड, १०वीचे गुणपत्रक, १२वी (असल्यास) गुणपत्रक, आयटीआय सर्व सेमिस्टर मार्कशिट, आयटीआय उत्तीर्ण प्रमाणपत्र व बँक पासबुकची छायांकित प्रत (आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक व DBT enable असणे आवश्यक) इ. कागदपत्रे हार्ड कॉपी स्वरुपात तसेच त्याच्या मूळप्रती Document Verification करीता औद्योगिक प्रशिक्षण विभाग मोरवाडी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे दिनांक २७/०४/२०२६ ते दिनांक ०८/०५/२०२६ (रविवार वगळून) रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत समक्ष जमा करावीत. मुदतीनंतर कोणतेही अर्ज / कागदपत्रे स्वीकारले जाणार नाही.

७) शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग, अंतिम वर्षातील परीक्षा गुण इ. संदर्भ अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. ऑनलाइन अर्जातील संबंधित माहिती स्पष्टपणे नमूद केले नसल्यास किंवा अर्ज अपूर्ण असल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्जाची हार्ड कॉपी व कागदपत्राची छायांकित प्रत कार्यालयात जमा केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

८) उमेदवार आय. टी. आय. परीक्षा सन २०२३, २०२४ व २०२५ मध्ये उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच कोपा (पासा) या व्यवसायाकरिता मराठी / इंग्रजी टंकलेखन उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

९) ज्या उमेदवाराने यापूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अथवा इतर कोणत्याही अस्थापना / संस्थेत Apprenticeship केली आहे. अशा उमेदवारांची दुबार नेमणूक करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१०) उमेदवार सध्या इतर कोणत्याही आस्थापनेत/संस्थेत/कंपनीत Apprentice म्हणून कार्यरत असल्यास, ते या भरतीसाठी अर्ज करण्यास पात्र असणार नाही.

११) उमेदवारांची निवड झालेनंतर, शिकाऊ उमेदवार म्हणून कामकाज करताना नियमित उपस्थिती नसल्यास किंवा प्रशिक्षण कालावधी पूर्ण न केल्यास संबंधित उमेदवारांना प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र (Apprentice Certificate) दिले जाणार नाही.

१२) अर्ज स्विकारण्याची मुदत संपल्यानंतर सर्व उमेदवारांची आरक्षणानुसार व गुणवत्तेनुसार सर्वसाधारण निवड यादी मनपाचे अधिकृत वेब पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येईल.

१३) नियुक्त झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी (मनपाचे विभाग) नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून ०८ दिवसांचे आत रूजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१४) कागदपत्रे तपासणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची निकषाप्रमाणे नियुक्तीसाठी कार्यवाही करण्यात येईल. यामधून जाहिरातीमध्ये नमूद केलेली व्यवसाय पदे आरक्षणानुसार भरण्यात येईल.

१५) www.apprenticeshipindia.gov.in (NAPS Portal) संकेतस्थळावर (Contract) करार नोंदणी केलेनंतर करार कोणत्याही परिस्थितीत संपुष्टात आणता येणार नाही.

१६) निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी / शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. तसेच वरिष्ठांनी नेमून दिलेले कामकाज करण्यास नकार दिल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नेमणूक रद्द करणेत येईल.

१७) उमेदवारांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

१८) उमेदवारांची नेमणूक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्यावेतन अदा केले जाणार नाही.

१९) नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण विभाग यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी शिकाऊ उमेदवारी नेमणूक कालावधी समाप्त करण्याचा अधिकार राहील.

२०) शिकाऊ उमेदवारांना नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांचा प्रशिक्षणार्थी कालावधी समाप्त करण्यात येईल.

२१) शिकाऊ उमेदवारांस प्रशिक्षण कालावधीमध्ये काही आजार उद्भवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२२) शिकाऊ उमेदवारांना त्यांच्या नेमणुकीच्या एक वर्ष कालावधीत इतर प्रकारचा कोणताही व्यवसाय करण्यास प्रतिबंध राहील. तसेच त्यांना कामकाजासंबंधीची कागदपत्रे / माहिती इत्यादीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

२३) शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणूक झालेल्या उमेदवारांस विद्यावेतनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही.

२४) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना / दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी / निवड रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाल्यानंतरही कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२५) अपात्र / निवड न झालेल्या उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२६) शिकाऊ उमेदवार यांच्या नेमणूक कालावधीमध्ये उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करून घेण्यात येईल.

२७) ऑनलाईन जोडण्यात आलेल्या कागदपत्रांचे तपासणी वेळी शैक्षणिक अर्हता धारण न करणे / अपूर्ण कागदपत्रे सादर करणे / अर्जात चुकीची माहिती भरणे अशा उमेदवारांस निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

२८) अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा अचूक ई - मेल पत्ता व मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक आहे.

२९) उमेदवारांची निवड यादी, प्रतिक्षा यादी व इतर सूचना ह्या वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्याबाबत उमेदवारांना ई-मेल / लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांनी समक्ष आय. टी. आय. मोरवाडी येथे येऊन विचारणा करू नये.

३०) अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी दिनांक ३०/०४/२०२६ पर्यंत ज्या व्यवसायाचे प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज केला आहे, त्या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर सर्व अर्हता धारण करणे तसेच अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३१) नेमणूकीसाठी आवश्यकतेनुसार बोलविल्यास उपस्थित उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता व इतर खर्च दिला जाणार नाही याची उमेदवारांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

३२) **केंद्रशासनाने निश्चित केलेल्या अद्ययावत सुधारित दरानुसार शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अनुज्ञेय राहील. तसेच MAPS या राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारी कालावधीसाठी शासनाकडून देय होणारा MAPS Claim चा लाभ घेता येईल.**

उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने apply करण्याबाबतच्या व इतर सर्वसाधारण सूचना तसेच सविस्तर जाहिरात महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी ती काळजीपूर्वक वाचून त्यानंतर www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन apply करावेत.

(शशिकांत पाटील)
प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

क्र.औप्रसं/०५/कावि/ ४४७/२०२६
दिनांक २३ / ०४ /२०२६